# बृहन्मुंबई महानगरपालिका

## मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

### कलम ४ (१) (ख)

### नियम पुस्तिका १ ते १७

# बृहन्मुंबई महानगरपालिका

केंद्र सरकारचा माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४(१)(ख) नुसार नियम पुस्तिका १ ते १७

# मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष

**(३१.१२.२०२१ पर्यंत अद्ययावत)**

# स्थापना आणि उद्दिष्टे

**स्थापना:**

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या मंजुरी **क्र. एमजीसी/एफ/९५०१ दिनांक ११.०५.२००७** अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये मध्यवर्ती पुराभिलेख कक्षाची स्थापना झालेली असून, सदर कक्ष सन २००८ पासून कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे:**

१. माहितीच्या अधिकाराखाली मागणी करणा-या अर्जदारास विहित वेळेत माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेतील महत्त्वाचा अभिलेख शास्त्रोक्त व पारंपारिक पध्दतीने जतन करण्यासाठी महानगरपालिकेतील कर्मचारी / अधिकारी यांना मार्गदर्शन करणे.

२. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकाच्या सर्व खाते/विभागांमध्ये वेळोवेळी भेटी देऊन अभिलेख वर्गीकरण, जतन व परिरक्षण करणे. तसेच ,अभिलेख कक्षाची उभारणी करणे, अभिलेख योग्य पध्दतीने सूचीबध्द करणे यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांतून संबंधितांना मार्गदर्शन करणे.

# नियमावली अनुक्रमणिका

| क्र. | नियमावली पुस्तिकेचा विषय |
|---|---|
| ०१ | प्रस्तावना |
| ०२ | संस्था, संस्थेची रचना, कार्य व कर्तव्ये यांचा तपशील. |
| ०३ | अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये. |
| ०४ | कार्यपूर्तीसाठी वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना पुस्तिका आणि अभिलेख. |
| ०५ | धोरणाची आखणी किंवा त्याची अंमलबजावणी करण्यासंबंधात जनतेच्या प्रतिनिधीचा सल्ला किंवा त्यांचे प्रतिनिधीत्व करण्याबाबत विद्यमान व्यवस्थेचा तपशील |
| ०६ | धारणाधीन किंवा नियंत्रणाधीन दस्तऐवजाच्या प्रकारांचे विवरणपत्र |
| ०७ | घटक म्हणून प्रस्थापित झालेली मंडळे, परिषदा ,समित्या व इतर गट याबाबतचे विवरणपत्र |
| ०८ | जन माहिती अधिकारी यांचे नाव, पदनाम व अन्य तपशील. |
| ०९ | निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती |
| १० | अधिकारी व कर्मचारी यांची नामनिर्देशिका. |
| ११ | नियमांतर्गत उपलब्ध असलेल्या भरपाई योजना कार्यप्रणालीसह प्रत्येक अधिकारी व कर्मचा-यांना मिळणारा मासिक मोबदला |
| १२ | प्रत्येक अभिकर्तासाठी दिलेली अर्थसंकल्पीय तरतूद (सर्व योजना, प्रस्तावित खर्च आणि वितरण अहवाल यांचा तपशील) |
| १३ | अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची पध्दत |
| १४ | संस्थेने दिलेल्या सवलती , परवाने किंवा प्राधिकारपत्रे प्राप्त करणा-यांचा तपशील |
| १५ | संस्थेने आपल्या कार्यपूर्तीसाठी आखून दिलेली प्रमाणके |
| १६ | इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती |
| १७ | नागरिकांना माहिती मिळण्यासाठी उपलब्ध सुविधांचा तपशील |
| १८ | इतर उपयुक्त माहिती |

# प्रस्तावना

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीनंतर पारदर्शक, प्रतिसादात्मक आणि उत्तरदायी प्रशासन देण्याची जबाबदारी महत्त्वाची ठरली असून त्यादृष्टीने माहिती आणि अभिलेखांचे व्यवस्थापन हा एक महत्वाचा विषय बनलेला आहे.  सर्व शासकीय कार्यालयांमध्ये एकसारखी कार्यपध्दती रहावी व चांगल्या अभिलेख व्यवस्थापनाच्या माध्यमातून माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत मागितली जाणारी माहिती तत्परतेने देता यावी यासाठी महाराष्ट्र शासनाने अंमलात आणलेल्या 'सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५' ची बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये योग्य पध्दतीने अंमलबजावणी करण्याकरिता सन २००८ साली मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

प्रशासकीय अधिकारी<br>
मध्यवर्ती पुराभिलेख कक्षाकरीता